


**ISSN Print:** 2394-7500
**ISSN Online:** 2394-5869
**Impact Factor:** 5.2
IJAR 2016; 2(1): 432-437
www.allresearchjournal.com
Received: 12-11-2015
Accepted: 15-12-2015

**प्रा. डॉ. पी.डी. जाधव**
पेमराज सारडा महाविद्यालय,
अहमदनगर

**Correspondence**
**प्रा. डॉ. पी.डी. जाधव**
पेमराज सारडा महाविद्यालय,
अहमदनगर

# ‘मराठी आणि हिंदी दलित आत्मकथने – स्त्री जीवनदर्शन

**प्रा. डॉ. पी.डी. जाधव**

भारतीया समाजव्यवस्थेत पुरूषी संस्कृतीला प्राधान्य मिळाल्यामुळे स्त्रियांना दुय्यम, कमी महत्वाचे स्थाने मिळालेले आहे. सगळयात स्तरावर उपेक्षित ठरलेली स्त्री ही पुढे आपल्या हक्कासाठी सन्मानासाठी झगडत असलेली दिसते. परंतू दलित जातीत जन्माला आलेली स्त्री, स्त्री म्हणून आणि दलित म्हणून दुहेरी शोषणाशी केंद्र ठरलेली आहे. मराठी आणि हिंदी दलित आत्मकथनातून प्रकट झालेले स्त्री अस्पृश्य समाजातील आहे. दलित समाजाला, दारिद्रय, भूक, अज्ञान, अंधश्रध्दा याने वेढलेले आहे. अनेक हालअपेष्टा सहन करणारी स्त्री ही दलितांहून दलित आहे. कारणी ती सर्वाणाकडून न धिक्कारली गेली आहे आणि स्वसमाजातील पुरूषवर्गाकडून पिळली गेली आहे. दलित स्त्रीचे ‘स्त्रीत्व’, आणि ‘दलितत्व’ हे घटक शोषणास कारणीभूत ठरतात. जातीव्यवस्थेने दलित ठरल्यामुळे आणि शिक्षणापासून वंचित ठरल्यामुळे दलित स्त्रीला गृहजीवन जगावे लागते. माणूस असूनही जनावरापेक्षाही हीन वागणूक तिला दिली जाते. ही वागणूक देणारा दलितेतर समाज आहे तसा तिचा स्वत:चा समाजही आहे. त्यामुळे तिची अवस्था डुबणाऱ्या माशासारखी झालेली आहे. जे जीवन तिच्या वाटयाला आलेले आहे विनातक्रार जगावे अशी तिची स्थिती करण्यात आलेली आहे.

दलित स्त्रीचे स्त्रीत्व आणि दलितत्व हे घटक तिच्या शोषणास कारणीभूत आहेत. स्त्रीत्वामुळे ती पुरूषप्रधानतेची बळी ठरते तर दलितत्वामूळे ती जातीव्यवस्थेची शिकार होते. यामुळे तिचे कुटूंबातील स्थान दुय्यम आहे. घर व कुटूंब चालविण्यासाठी तिला पडेल ते काम करावे लागते. ‘‘सतत श्रम करणे, त्या श्रमाचा मोबदला ही पुरेसा मिळत नाही. कारण तिच्या श्रमाच्या मूल्याचे निकष जातीवरून ठरविले जातात. खालच्या जातीची स्त्री म्हणजे तिचे श्रमदेखील हलक्या किंमतीचे असा अनोखा नियम दलित स्त्रीयांसंदर्भात रूढ आहे. जातीव्यवस्था ही भारतीय स्त्रियांचे शोषण करणारी अनन्य संस्था आहे. यामुळेच भारतीय स्त्री शोषणात अधिकच भर पडली आहे.’’ दलित चळवळीमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्या प्रा. प्रतिमा परदेशी यांचे निरीक्षण जात आणि दलित स्त्री यांच्यातील अन्वयाचे स्पष्टीकरण करणारे आहे. दलित स्त्रीचे आर्थिक व सामाजिक शोषण जातीवर आधारीत आहे. कुटूंबातील कर्ता पुरूष तिचे हक्क नाकारता किंवा मानहानी करतो. या कर्त्यापुरूषावर सवर्ण संस्कृतीचे संस्कार आहेत. त्याचे पुरूषपण अहंकाराने भरले आहे. पुरूष हा प्रथम आहे. त्यामुळे स्त्रीच्या वाटयाला आपोआपच कनिष्ठत्व प्राप्त होते. या दुय्यमतेमुळै स्त्रीचे अंगभूत नैसर्गिक व्यक्तीमत्व कोमजले जाते. तिचे खच्चीकरण होते. या खच्चीकरणाचे चित्रण मराठी व हिंदी दलित आत्मकथनातून प्रकट झालेले आहे.

### मराठी दलित आत्मकथनातील स्त्रीजीवनदर्शन

मराठी दलित आत्मकथनातून प्रकट झालेले स्त्रीजीवन वेदनेने आणि कारूण्याने ओथंबलेले आहे. दलित समाजाला समाजव्यवस्थेतून शुद्र लेखले. या शुद्रांवर वर्षानुवर्षे अनन्वीत अत्याचार केले. या शुद्र, अस्पृश्य समाजातील स्त्री म्हणजे पायाची दासीच. ती जणू निर्बुध्द निर्जिव वस्तू आहे असे समजून तिला समाजव्यवस्थेने वागविले. ती नेहमी दुय्यम राहिली आहे. अन्याय, अत्याचार, छळ सोसण्यासाठीच तिचा जन्म झाला. ‘चूल आणि मूल’ हे तिचे क्षेत्र. त्यातही निर्णय घेण्याची वेळ आली कि तिला कुठलाच अधिकार नाही. दलितांची स्त्री यापेक्षा वेगळी नाही. अस्पृश्य आणि त्यामुळे शोषित, भरडली जाणारी, पिळली जाणारी आहे. सतत राबणारी आपल्या नवऱ्याच्या सुखात सुख मानणारी, अहोरात्र त्याची सावली सारखी सोबत करणारी अशी ती आहे. दलित आत्मकथनातील स्त्री ही नवऱ्याच्या व मुलाबाळांच्या फाटक्या, तुटक्या संसाराची काळजी करणारी, त्याला जपणारी सोशिक मनाची आहे. दलित आत्मकथनातील स्त्री

पुरूषांच्या बरोबरीने राबते, ती नवऱ्यापेक्षाही जास्त राबते. स्वत: कष्ट करून नवऱ्याला हिंमतीने, जिद्दीने उभी करते. घरातील पुरूष व्यसनी असेल, आळशी असेल, तर स्त्रीच पुढाकार घेवून संसाराचा गाडा रेटताना दिसते, नवऱ्याच्या माघारी, नवरा कालवश झाल्यावरही ती पुढाकार घेवून खंबीरपणे उभी राहते. दलित आत्मकथनातील स्त्रीचे विविध रूप आपल्याला बघायला मिळतात.

शांताबाई कांबळे यांच्या माझ्या जल्माची चित्तरकथा या आत्मचरित्रात दलित स्त्रीचे अनेक विविध रूप पहायला मिळते. या आत्मकथनाची लेखिका स्त्री आहे. दलित स्त्रीचे जवीन कसे असते याचे अनेक संदर्भ बघायला मिळतात. दलित स्त्री निर्बुध्द आणि निर्जीव वस्तू आहे असे समजून तिला समाजव्यवस्थेने वागविले. शांताबाई कृष्णाजी कांबळे यांचे पती शिक्षक असूनही शांताबाईला न कळवता दुसरी बायको करतात. ती मेल्यानंतर परत त्यांच्याकडे येतात. परंतू स्वावलंबनाने ताठ उभे राहणाऱ्या स्त्रीचे प्रातिनिधीक रूप म्हणजे शांताबाई कांबळे हे चित्र माझ्या जल्माची चित्तरकथा मध्ये आढळते. पण आपल्या पतीच्या पुनर्विवाहामुळे शांताबाई मानसिकदृष्टया खचलेल्या दिसतात. पतीला घटस्फोट न देता स्वाभिमानाने त्या एकटया राहतात. पुढे ही खंबीर, जिद्दीने, नेटाने संसार करणारी स्त्री दलित आत्मकथनात दिसते.

'बलुत' दया पवार यांचे आत्मकथन आहे. या आत्मकथनात दलित स्त्रीजीवनाचे विविध पैलू आपल्याला सापडतात. दया पवार यांची आई म्हणजे खंबीर वृत्तीची आहे. जिद्दीने आपल्या कुटूंबाला पोसणारी बाई. नवऱ्याच्या माघारी, वैधव्य प्राप्त झाल्यावरही ती कर्तीसवरती होवून खंबीरपणे उभी राहणाऱ्या प्रतिनिधीक स्वरूपातील स्त्री आहे. पावलोपावली संघर्षासाठी सिध्द रहावे लागते. नवरा दारूबाज व बाहेरख्याली असूनही दया पवारांच्या आईने नवऱ्याला साथ दिली. नवऱ्याच्या माघारीही त्याचे गुणगानच ती गात राहिली. नवरा कालवश झाल्यानंतरही हिंमतीने आणि कष्टाने आपल्या मुलांना वाढवले. तशीच दया पवार यांची आजी आयुष्यभर काडीचाही सुख न लाभलेली स्त्री आहे ती हाळवी होते. एकेकाळी खूप देखणी असणारी (बानो) तिचा नवरा तिला सोडून देतो. विडयाच्या कारखान्यात विडया वळीत तिला आयुष्य कंठावे लागते. विठाबाई ही देखील अशीच एक स्त्री आहे. महार जातीत जन्माला येऊनही तिची भाषा, राहणीमान हे पांढरपेशा समाजातील स्त्रियांसारखे असते.

मराठी दलित आत्मकथनात प्रकट झालेली दलित स्त्री मूलबाळ नसल्याने 'स्त्री' या व्यवस्थेत सर्वच स्तरावर शोषणाची धनी ठरलेली आहे. भारतीय समाजव्यवस्थेत पुरूषी संस्कृतीला प्राधान्य मिळाल्यामुळे करूण संपूर्ण स्त्रीवर्गाला दुय्यम स्थान मिळालेले आढळले. दलित समाजात जन्माला आलेली स्त्री, स्त्री म्हणून आणि दलित म्हणून दुहेरी शोषणाची केंद्र ठरलेली आहे. दलित स्त्री ला सर्वसामान्य सर्व स्त्रीच्या वाटयाला जे दु:ख आलेले ते दु:ख ही तिच्या वाटयाला आल. पण जातीव्यवस्थेमुळे ती दलित ठरल्यामुळे आणि हेतू परस्पर शिक्षणापासून वंचित ठेवल्यामुळे तिला गृहीणी म्हणून जीवन जगावे लागले. या जातीनिहाय सामाजिकव्यवस्थेत ती कमजोर ठरली आहे. स्त्री म्हणून अन्याय अत्याचाराची धनी ठरलेली आहे. मराठी दलित आत्मकथनातून जे जीवन चित्रण झालेले आहे. त्यातील स्त्रीचे जीवन अधिकच शोषित पिडीत अशा स्वरूपाचे माझ्या जल्माची चित्तरकथा या आत्मकथेत शांताबाई अस्पृश्यतेचे आणि स्त्री तत्वाचे चटके सहन करते पतिने रितसर विवाह केला असला तरी नंतर दुसऱ्या स्त्रीशी देखिल त्याने विवाह केला. पुरूष दलित असा कि त्याची सवर्ण मानसिकता ही पुरूषीच असते. या चा प्रत्यय शांताबाईच्या पतिच्या अनुषाने येतो. 'बलुतं' मध्ये लेखक दया पवाय ने पहिले लग्न केलेले असतांना दुसऱ्या स्त्रिशी विवाह करतात. दया पवारांचे काका आपली बायको आपल्यासमोर ताट मानाने उभी राहतात म्हणून तिला बेदम मारहाण करतात. समला, वडारीन गऊ या स्त्रीया म्हणजे या व्यवस्थेत माणूस म्हणून जन्माला येऊन ही जनावराप्रमाणे जगताना दिसतात. हे समाज वास्तव आत्मकथनाच्या माध्यमातून आपल्या नजरेत भरते.

नाचणाऱ्या बाईची अवस्था एखाद्या मेणबत्तीसारखी असते. मेणबत्ती स्वत: जळते आणि दुसऱ्यांना प्रकाश देते. छंदी फंदी पैसेवाला रंगेल समाज तीच नाच गान पाहून आनंद लुटतो. तिचे नातेवाईक तिने नाचत गात स्वत:ला प्रदर्शनात मांडीत कमावलेल्या पैशावर चैन करतात, मौजमजा करतात, समाजही तिला वेश्या समजतो सगळे तारूण्या नातेवाईकांना सांभाळण्यात घालविणाऱ्या स्त्रीच्या आयुष्यात वृध्दकाळात कोणीच आधार देत नसत. तिचा कोणताही नातेवाईक तयार नसतो. केळी खाऊन रस्त्यावर फेकून दिलेल्या सालपटाप्रमाणे ही अवस्था कोल्हाटी समाजातील स्त्रीयांची असते. कोल्हाटी समाजातील स्त्रीला नवरा नसतो, ती कोणाची पत्नी नसते, मातृसत्ताक कुटूंब संस्थेसारखी व्यवस्था आपल्याला दिसून येते.

किशोर काळे यांच्या 'कोल्हाटयाचं पोरं' या आत्मकथनात कोल्हाटी समाजातील स्त्री जीवनाचे दर्शन घडवून मराठी साहित्यात फार मोलाची भर टाकलेली आहे. मराठी साहित्याच्या वाचकांना मराठी समाजाला या अनुषंगाने कोल्हाटी समाजातील 'स्त्री' वैश्या नसेल तर ती आपल्या अंगातील केलेचे प्रदर्शन करून पोटाची खळगी भरते आपल्या नाचण्यातून नातेवाईकांचे, मुलाबाळांचे संगोपन करते. पुरूषी संस्कृतीत जगलेल्या बधीर समाजाच्या मानसिकतेची बळी ठरलेली ही 'स्त्री' जीवनात अनेक समस्यांना सामोरी जाते. अनेक अडथळे सहन करून जगते म्हणूनच किशोर काळे यांनी स्त्रीच्या पोटी जन्म घेवून एम.बी. एस होण्यामध्ये किशोरच्या कर्तृत्वाचा फार मोठा भाग आहे. हे कर्तृत्व कोणीही नावाजावे प्रशंसा करावी असेच आहे. परंतू समाजाने जन्मत:च नाजायज, अनौरस ठरविल्याचे दु:ख केवढे भयंकर आहे. याची कल्पना हे आत्मकथन वाचल्यानंतर येते.

'उपरा' व 'उचल्या' या आत्मकथनातील स्त्री भटक्या जमातीची आहे. तीची जीवन गावगाडयातील स्त्रीपेक्षा जास्तच संघर्षाने भरलेली आहे. स्वत:च्या समाजातही तिला मानाचे स्थान नाही. एखादा पुरूष पैशाच्या मोबदल्यात दुसऱ्या पुरूषाकडे ठेवता जात पंचायत सुध्दा तिच्या बाजून निर्णय देत नाही. ''ती गाय आहे पहिले दुसऱ्याच्या दावणीला होती आता ती त्या दावणीला काही दिवस राहिली मग तिथून ती गाय दुसरीकडे कवठयात बिना मालकाची राहिली.'' अशी ही भटक्या विमुक्त जमातीतील स्त्रीयांची अवस्था असते. ती गाय आहे म्हणजे ती जनावर आहे. ती कोणाच्याही मालकीची होवू शकते. ती पुरुषप्रधान संस्कृतीची मानसिकतेची बळी आहे. 'उपरा' मधील पुन्नाप्पा आपल्या बायकोला पैशाच्या आशेपोटी धर्माकडे ठेवतो त्याची बायको जी कैफियत मांडते त्यातून भटक्या विमुक्तातल्या स्त्रीचे सर्वांगिण दर्शन घडते. ''महाराज मी एक जनावर आहे, हिरवा घास दिसला खाल्ला. रितीरिवाज कशाला केलाव? हयो चार वर्ष मला घाण ठेवून भाड खायाची म्हणतूया शेजला दिल, तो बाजंला घिल. त्यो का फुकट खाया घाललं? त्यात बायाची जात. आन् ढोरांचखे जात सारखीच.'' या ठिकाणी एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे भटक्या समाजातील स्त्रीचे अस्तित्व म्हणजे केवळ एक तारण योग्य वस्तू एवढेच आहे. तिचा होकार, नकार, तिची इच्छा, तिचे मन याला काहीच किंमत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे स्त्रीला येथे कधी पायातील चप्पल, वहाण किंवा पायतान म्हणून गृहित धरले आहे ती पायात बसते. एवढेच महत्त्वाचे आहे. ज्याच्या पायात ती बसली ती त्यांची मग, त्याने ती खुशाल वापरावी कारण स्त्री एक मुके जनावर आहे. जो घेवून जाईल त्याच्या मागे ती जाईल. जो खायला घालेल, त्याची मालकी दरिद्री, हीनदीन जीवन जगणाऱ्या समाजात स्त्री आणखी हीन दीन अवस्थेत

जगते. केवळ वापरावयाची वस्तू म्हणून ती कधी चप्पल, कधी सनांग, कधी हिरवा घास खाणारे जनावर असे उपपद घेवून ती जगताना दिसते. भटक्या विमुक्त जाती जमातीतील स्त्रीयासंदर्भात डॉ. मंगला खिंवसरा लिहितात, ''भटकेपाणामुळे स्त्रिला प्रतिष्ठा मिळालेली नाही. दलित व भटक्या जातीतील स्त्रियांचे प्रश्न सारखे आहेत. पण स्वरूपात बदल आहे. दोन्ही ठिकाणी पुरूषप्रधान संस्कृतीचा पगडा आहे.'' दलित समाजातील स्त्रिया व भटक्या जाती–जमातीतील स्त्रीयांच्या प्रश्नांचे स्वरूप वेगळे आहे. पण या दोन्ही वर्गातील स्त्री ही पुरूषप्रधान संस्कृतीची बळी ठरलेली दिसते.

'अक्करमाशी' या शरणकुमार लिंबाळे यांच्या आत्मकथनात दलित स्त्रीचे जीवन चित्रीत झालेले आहे. मसामाय, संतामय, यांचे जीवन म्हणजे भयंकर वेदनेचे आहे. एका पर पुरूषाच्या अनैतिक संबंधातून निर्माण झालेल्या एका तरूणाचे आत्मकथन आहे. आई–वडीलांच्या अनैतिकतेला बलात्कार समजून आईल (मसामायला) माफ करण्याची लेखकाची दृष्टी म्हणजे, 'स्त्री' जातीवर केलेले उपकार वाटतात. ''या संभोगाला संस्कृतीत प्रतिष्ठा मिळवून दिली होती. याउलट माझी आई अस्पृश्य, दारिद्रय. ती उच्च कुळात जन्मली असती, श्रीमंत असती तर ती या बलात्काराला कशी तयार झाली असती? हा व्याभिचार नसून माझी आई समाजव्यवस्थेची बळी आहे.'' ही भूमिका खरे तर मातृत्वाची जाणीव असणारा माणूसच जाणू शकतो. 'अक्करमाशी' त लेखकाच्या बहिणी नागी, निरमी, वनी, सुनीखपमी या मुली म्हणजे स्त्रीजीवनाचे प्रतिबिंब आहेत. शेवंता, विठाबाई पाटलाची बाई या स्त्रीया म्हणजे दळलेल्या, पिचलेल्या जीवनाला सामोरे जात असलेल्या पण आशादायी जीवन जगताना दिसतात.

'कोल्हाटयाचं पोरं' किशोर शांताबाई काळे यांच्या आत्मकथनात 'कोल्हाटी' समाजातील स्त्रीजीवनाचे अनेक पैलू रेखाटलेले आहे. 'कोल्हाटी' समाजातील स्त्री म्हणजे पोटासाठी नाचगाणी करून आपले व नातेवाईकांचे पालनपोषण करणारी शोषित अशी स्त्री आहे. कोल्टी समाजातील स्त्री म्हणजे अहोरात्र कष्ट करायचे आणि उलट पुरूषाने तिच्या जीवावर मौज मजा करायची. म्हणजे स्त्रियांनी कष्ट करायचे, राबायचे आलेला पैसा मात्र पुरूषांजवळ आणून द्यायचा. हा पुरूष मग बाप, (कोंडीबा), भाऊ, मामा, काका, असा कुणीही असू शकतो. 'स्त्री' म्हणजे तसे तसे विचे अवमूल्यन होत जाऊन शेवटी तिचे हाल जनावरापेक्षाही वाईट होणारे असते.

'कोल्हाटी' समाजातील स्त्री ही दुसऱ्याची 'रखेली' ठेवलेली बाई म्हणूनच जगते. समाज तिला वेश्या म्हणूनच पाहतो. दुसऱ्याची वासना तृप्त करण्यासाठीच या स्त्रियांचा जन्म झालेला आहे असे समजले जाते. 'कोल्हाटयाचं पोरं' या आत्मकथनातील स्त्री पात्रे म्हणजे मेणबत्तीसारखे जीवन जगणारी आहेत. मेणबत्ती स्वत: जळते आणि दुसऱ्याला प्रकाश देते. छंदी–फंदी, पैसेवाल, रंगेला समाज तिचं नाचणं पाहून आनंद लुटतो. तिचे नातेवाईक तिने नाचत, गात, स्वत:ला प्रदर्शनात मांडीत कमावलेल्या पैशावर आयते बसून चैन करतात. मौज मजा करतात. समाज तिला वेश्या समजतो. सगळे तारूण्य नातेवाईकांना सांभाळण्यात घालवणाऱ्या त्या स्त्रीच्या आयुष्यात म्हातारपणी कुणीही आधार नसतो. तिचं म्हातारपण म्हणजे केळी खावून रस्त्यावर फेकून दिलेल्या सालपटाप्रमाणे होते. किशोर काळे यांची आई शांताबाई, जिजी, चंद्रकलाबाई, मालनबाई, सुशीलामावशी, रूक्मिणी, कुसूममावशी, कांताबाई, रंभामावशी, नागीणमावशी, बेबीमावशी, या स्त्री म्हणजे आयुष्यभर दु:खदायक वेदनात्मक जीवन जगणाऱ्या स्त्रीची मूर्तिमंत उदाहरणे आहेत.

दलित आत्मकथनातून चित्रित झालेले स्त्रिजीवन वेदनेने आणि कारूण्याने ओथंबलेले आहे. हे स्त्रीजीवन अस्पृश्य, भटक्या समाजातील आहे. दारिद्रय, अज्ञान, अंधकार आणि भूक याने वाढलेले आहे. ही नरकासमान जगणारी स्त्री दलिताहूनही दलित आहे. ती सवर्ण समाजाकडून धिक्कारली गेली आहे. तसेच स्वसमाजातील पुरूष संस्कृतीची बळी ठरलेली आहे. तिचे शारिरिक आणि मानसिक शोषण झालेले आहे. मराठी आत्मकथनातील स्त्री ही वेदनेचा गोळा आहे. स्त्रीत्वामुळे पुरूषप्रध्धानतेचेची बळी ठरते, तर दलितत्वामुळे ती जाती व्यवस्थेची शिकार झालेली आहे. मराठी पोटतिडकीने तळमळीने स्त्रीजीवनाच्या विविध पैलूंना साकार करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडलेली आहे.

**हिंदी दलित आत्मकथने:– स्त्री संवेदना**

मराठी दलित आत्मकथनातील स्त्रीजीवनाचे विविध पैलू प्रकट होतात. तसेच तेवढयाच वेदनेने आणि कारूण्याने ओथंबलेले स्त्रीजीवन हिंदी दलित आत्मकथनांमध्ये प्रकट झालेले आहे. 'स्त्री' कोणत्याही प्रदेशातील असो, कोणत्याही भाषिक समुहातील असो ती स्त्रीच आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील पुरूषी संस्कृती मुळे तिला दुय्यमत्व लाभलेले आहे. हिंदी आत्मकथनातील स्त्रीसुध्दा सर्वच पातळयांवर उपेक्षित ठरलेली आहे. ती स्त्री उच्चवर्णीयांकडून पिळली गेली आहे. तिचे शारिरीक आणि मानसिक शोषण होत आहे. हिंदी दलित आत्मकथनातील स्त्री सुध्दा दलित आहे. दलित स्त्रीचे स्त्रीत्व आणि दलितत्व हे दोन घटक शोषणास कारणीभूत असतात. स्त्रीत्वामूळे ती पुरूष प्रधानतेची बळी ठरते तर दलितत्वामुळे तीजातिव्यवस्थेची शिकार होते. जातीव्यवस्थाही भारतीय दलित स्त्रियांच्या शोषण करणारी अनन्य संस्था आहे. यामुळेच भारतीय दलित स्त्रीयांच्या शोषणात अधिकच भर पडली आहे. मनुस्मृतीमध्ये स्त्रीजीवनाचे वर्णन एका श्लोकात केलेले आहे.

> ''पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने
> रेक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वांतत्रमर्हति'' ३

म्हणजे 'स्त्री' कुमारी असेच तिचे रक्षण पिता करतो. तरूण होते तेव्हा तिचे रक्षण पती करतो आणि वृध्द झाल्यानंतर तिचे रक्षण पुत्र करतो. पण दलित स्त्री चे रक्षण मात्र कोणीच करीत नाही. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे 'कोल्हाटी' समाजातील 'स्त्री' चे घेता येईल. एकूणच 'स्त्री' कोणत्याही वर्गातील असो ती स्वतंत्र मात्र नाही. तिला कोणाच्यातरी आश्रयाची गरज आहे. हेच मनृस्मृतीतून सांगितले गेले आहे. सवर्ण कुटूंबातील स्त्रीच्या वाटयाला आलेले दु:ख दलित स्त्रीपेक्षा कमीच आहे. दलित 'स्त्री' म्हणून आणि दलित म्हणून या दोन्ही पातळीवरील शोषण सहन करते. जातिव्यवस्थेत दलित स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले त्यामुळे तिला गृहजीवन जगावे लागले. माणूस असूनही जनावरांपेक्षा हीन वागणूक दिली गेली ही वागणूक देणारा दलितेत्तर समाज होता, तसा स्वत:चा समाजही होता. त्यामुळे 'इकडे आड तिकडे विहीर' अशी तिची कोंडी झालेली आहे. वाटयाला आलेले जीवन कोणतेही तक्रार न करता जगणारी दलित स्त्री आपल्याला आत्मकथनातून दिसते. मराठी आत्मकथनात दलित स्त्री जशी व्यक्त झाली आहे. तशीच हिंदी आत्मकथनामध्ये व्यक्त झाली आहे. आत्मकथाकारांनी फार आत्मीयतेने केलेले आहे.

हातावर पोट भरणाऱ्या आणि डोक्यावर उभा संसार वाहणाऱ्या दलित स्त्रिया कष्टाच्या मूर्तिमंत ठरतात. दलित स्त्रिया आपल्या व कुटूंबीयाच्या पोटाची खळगी भरण्यासाठी वाटेल ते कष्ट करतात. समाजात या कष्टाला शून्य किंमत असते. दलित स्त्रियांच्या श्रमाची अप्रतिष्ठा आणि अवहेलना जातीव्यवस्थेमुळे त्यांच्या पदरात बांधली गेली. निमूटपणे अन्याय सहन करणाऱ्या या स्त्रीयाच केवळ दोषी नसून, वर्णव्यवस्था त्याला कारणीभूत ओ. या वर्णव्यवस्थेतील दलित स्त्री सवर्णांच्या वासनेची धनी

होते. अज्ञान, अंधश्रध्दा यांचा फायदा घेत सवर्ण लोक दलित स्त्रीयांची अब्रू लूटण्याचा प्रयत्न करतात. 'मै भंगी हूँ' मध्ये भगवानदास लिहीतात. ''हिंदू मुझसे घृणा करता था, परंतू मेरी औरत, बहन और बेटी उससे बची थी क्योंकी उनकी नजरों मे वो अस्पृश्य थी और अस्पृश्य के साथ यौन संबंध असम्भव थे! विवाह असंभव था परंतू मुसलनामों से मेरी बहन, बेटी और महफूज न था परंतू एक फर्क था कभी—कभी गरीबी और अज्ञानता के कारण कभी लालच या अय्याशी के कारण वह बहकावे मे आ जाती थी! कही मुस्लिम उससे निकाह करके अपनी बेगम बनाकर घर मे डाल लेता था! या यूं दनकी गरीबी, अज्ञानता और मेरी कमजोरी का फायदा उठाकर ऐश करता रहता था!

गोशत खने के शोक, छुत छात से छुटकारा पाकर अपना सामाजिक स्तर उँचा करने क इच्छा, कुछ मुसलमानों की हवस परस्ती के कारण मेरी बहुत सी खूबसुरत बहने, बेटियॉ और माताएँ मुस्लिम घरानों की रौनक, उँचा स्थान बनाए रखने के लिये वे न सिर्फ मुझे अपनाने को तैयार न थी, बल्की व जाहिरन नफरत भी करती थी! (मै भंगी हूँ पृ. ४३,४४)'' मराठी दलित आत्मकथांमध्ये दलित स्त्रीयांवर अन्याय, अत्याचार करणारा दथला सवर्ण वर्ग म्हणजे ब्राह्मण, मराठी इ. असतात. पण हिंदी प्रदेशामध्ये जीवन जगणाऱ्या दलित समाजातील स्त्रीयांना तेथील मुस्लीम लोकांच्या अन्यायाला तोंड द्यावे लागते. चटके सहन करावे लागतात 'स्त्री' ही स्त्रीवादी संघटनेत काम करणारी असली तरी ती दप्तरी स्त्रीयांसोबत पुरूषी मानसिकतेने वागते. हा अनुभव लेखिकेला येतो. तरीसुध्दा सार्वजनिक जीवनाचा वसा पत्करून स्त्रीयांसाठी कार्य करणाऱ्या कौशल्य बैसंत्री यांचे व्यक्तीमत्व वैशिष्टयपूर्ण ठरते. ध्येयवाद आणि सामाजिक कार्यावरी निष्ठा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर असीम निष्ठा कौशल्य बैसंत्रींच्या जीवनातून प्रकट झाली. त्यामुळे त्यांचे जीवन व्यक्तीगत न राहता खऱ्या अर्थाने सार्वजनिक आणि लोकांसाठी विशेषत: स्त्रीयांसाठी उपयुक्त ठरले.

हिंदी दलित आत्मकथनातील स्त्री या व्यवस्थेतील सर्वच स्तरावर शोषण झालेली अबला आहे. हिंदी आत्मकथनातील 'स्त्री' ही वेगवेगळया प्रदेशातील आहे. वेगवेगळी भाषा बोलणारी जरी असली तरी वेदनेने व करूणेने ओथंबलेली आहे. अंधश्रध्देने बरबटलेली, सावकार, धनीक लोकांच्या शारिरीक, शोषणाला बळी पडलेली, 'स्त्री' या आत्मकथेत दिसून येते. 'मै भंगी हूँ' भगवानदास यांच्या आत्मकथेत मुस्लिम लोकांच्या वासनेचा शिकार झालेली 'स्त्री' आपल्याला दिसते. मुस्लिम व्यापार, जमीनदार, राजपूत लोक तिच्या गरीबीचा आणि दारिद्रयाचा आधार घेवून तिचे शोषण करतात. हिंदी आत्मकथनातील 'स्त्री' ही अज्ञानी आहे. अंधविश्वासी आहे. दरिद्री आहे. तिला श्रमाची अनेक कामे करावी लागते. घरातील परिवाराचे पोट भरण्यासाठी 'भंगी' कामे करावी लागतात. शाळेसारख्या पवित्र ठिकाणी सुध्दा शिक्षक आई—बहिणीवर शिवी देतात. 'जूठन' मध्ये ओमप्रकाश वाल्मिकीची आई हिंदू मुसलमानांच्या घरी साफ—सफाईचे काम करते. तरी तिला त्याच्या श्रमाचा मोबदला व्यवस्थित मिळत नाही. आपला मुलगा शिकावा साहेब व्हावा अशी आशा बाळगून असणारी स्त्री येथे दिसते.

दलित समाजात 'स्त्री' ला दुय्यम स्थान आहे. सवर्ण लोक तिला तिच्या जातीवरून संबोधन करतात, ''ऐ चोमार की, ये महार की, फलाने की'' असे संबोधन स्वीकरत ती जगत असते. समाजातील 'स्त्री' म्हणजे पुरूषाची गुलामी आहे. तिच्या लग्नप्रसंगी हुंडा मागितला जातो. 'स्त्री' म्हणजे शालिन, सुंदर, नैतिक असावी अशी अपेक्षा ठेवली जाते. 'मेरा सफर मेरी मंजिल' या आत्मकथनात डी.आर. जाटव यांनी स्त्री जीवनासंदर्भात गंभीर वृत्तीने आपले विचार व्यक्त केले आहेत. समाजात स्त्रीयांवरच पारंपारिक बंधनाचे फास अडकवले जातात. पुरूष गुणांची गणती केल जाते. म्हणजेच पुरूषाच्या दृष्टिने स्त्री ही शोभेची वस्तू आहे. तिला ईच्छा, अपेक्षा, भाव—भावना असतात. याचा कवडी मात्र विचार केला जात नाही. ही खंत डी. आर. जाटव यांनी व्यक्त केली आहे.

हिंदी आत्मकथनातील 'स्त्री' पोट भरणाऱ्या आणि डोक्यावर उभा संसार वाहणाऱ्या दलित स्त्रिया या कष्टाच्या मूर्तिमंत प्रतिक आहेत. सर्वच बाजूने कोंडी झाल्यामुळे हवालदिल झालेले स्त्रीमन चिकाटीने परिस्थितीशी झुंजत राहते. टकरा देते. कौशल्य बैसंत्री यांच्या दोहरा अभिशाप मधील कौशरूल्या स्त्रीजीवनाचे प्रतिरूप आहे. पारंपारिक बंधनात अडकलेल्या स्त्रीचा मोठया प्रमाणात कोंडमारा होत असतो. पण या रूढींना झुगारून उच्चशिक्षण घेणारी कौशल्या म्हणूनच संघर्षशील जीवनाचा हुंकार ठरते. पण शेवटी पुरूषी अहंकाराची बळी ठरते, देवेंद्रकुमारसारखा अपमतलबी, क्रूर पुरूष कौशल्या बैसंत्री याचे शोषण करते, स्त्री शिक्षीत असो किंवा अशिक्षीत तिला पुरूषांच्या अहंकाराला तोंड द्यावे लागते. हेच या चित्रणातून, आत्मकथनातून दिसून येते. तात्पर्य दलित स्त्री ही सर्वस्तरीय शोषणाची मालमत्ता आहे. जातनिहाय दृष्टिने ती सामाजिक दृष्टया कमजोर ठरलेली आहे. स्त्री म्हणून होणाऱ्या अन्याय, अत्याचार, शोषणाची ती धनीण ठरलेली आहे. दलित आत्मकथनातून जे जीवन अधोरेखित झाले आहे. त्यातील स्त्रीचे जीवन अधिकच शोषित, पिडीत स्वरूपाचे आहे.

## मराठी आणि दलित आत्मकथनातील स्त्री संवेदना निष्कर्ष

मराठी आणि हिंदी दलित आत्मकथनात चित्रीत झालेले स्त्रीजीवन म्हणजे वेदनेने आणि कारूण्याने ओथंबलेले आहे. हे स्त्रीजीवन अस्पृश्य, दलित समाजातील आहे. दलित समाजातील स्त्रीजीवन दारिद्रय, भूक, अज्ञान आणि अंधश्रध्दा वेढलेले आहे. नरकासमान जीवन जगणारी दलित स्त्री ही दलिताहून दलित आहे. ती उच्चवर्णीयांकडून पिळली गेलेली आहे. आणि स्वसमाजातील पुरूषवर्गाकडून धिक्कारली गेलेली आहे. दलित आत्मकथनातील स्त्रीचे शोषण शारिरीक आणि मानसिक स्वरूपाचे आहे. मराठी आत्मकथनातील स्त्रीजीवन जेवढे वेदनेने ओथंबलेले आहे तेवढेच हिंदी दलित आत्मकथनातील स्त्रीजीवन वेदनेने आणि कारूण्याने ओथंबलेले आहे. कारण दोन्ही भाषेतील आत्मकथनात 'स्त्री' ही दलित आहे. दलित स्त्रीचे 'स्त्रीत्व' आणि 'दलितत्व' हे दोन घटक तिच्या शोषणास कारणीभूत आहेत. दलित आत्मकथनातील 'स्त्री' ही स्त्रीत्वामुळे पुरूषप्रधानतेची बळी ठरते, तर दलितत्वामुळे ती जातिव्यवस्थेची शिकार झालेली आहे. दलित स्त्रीचे कुटूंबातील स्थान दुय्यम आहे. तिचे जीवन म्हणजे कुटूंबातील पडेल ती कामे करणारी, सतत श्रम करणारी, तिचा दिनक्रम असतो. तिच्या श्रमाला मोबदलाही पुरेसा मिळत नाही. कारण तिच्या श्रमाच्या मुल्याचे निकष ही जातीवरून ठरतात. दलित आत्मकथनातील 'स्त्री' ही दलित आहे. भटक्या जाती जमातीतील आहे. ती सवर्णाच्या वासनेची बळी ठरलेली अबला आहे. सवर्णाची 'रखेल म्हणून जीवन जगणारी रखेली आहे. स्वजातीतील पुरूषांच्या शोषणाला बळी पडलेली नारी आहे. दलित आत्मकथाकाराने स्त्रीजीवनाच्या विविध पैलूंना साकार करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.

मराठी आणि हिंदी आत्मकथनातील स्त्रीसंवेदनांचा अभ्यास करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे दोन्ही भाषेतील स्त्रीजीवन हे दलित 'स्त्री' चे जीवन आहे. दलित 'स्त्री' ही कोणत्याही प्रदेशातील असो, कोणत्याही भाषिक समूहातील असो ती 'स्त्री' आहे. स्त्रीयांना वेगवेगळया समस्यांना सामोरे जावे लागते त्या सर्वांचे चित्रण फार आत्मियतेने आणि आपुलकीने केलेले दिसते. मात्र मराठी आत्मकथाकाराने जेवढया आक्रमकपणे, सुक्ष्मपणे स्त्रीजीवनांच्या विविध पैलूंना चित्रीत केलेल आहे, तेवढे हिंदी दलित आत्मकथाकाराने केलेले दिसत

नाही. मराठी आत्मकथनातील 'स्त्री' ही त्या आत्मकथनाची नायिका म्हणून आपल्या नजरेत भरते. तिचे शोषण, तिची होरपळ वाचकाच्या मनाला चटका लावून जाते. मनात अनेक प्रश्न निर्माण करते. तसे हिंदी आत्मकथनातील चित्रणात दिसत नाही. आत्मकथन नायकाच्या जीवनानुषंगाने काही 'स्त्री' ही पुरूषांच्या हातातील खेळणे आहे. तिला पुरूषांच्या बरोबरीने कामे करावी लागतात. सवर्णाच्या शेतात कामे करताना तिची आब्रू लुटली जाते. स्वसमाजातील पुरूष थोडया पैशासाठी तिला गहाण ठेवतात. जातपंचायतीला सामोरे जावे लागते. ती एक मुकी जनावर आहे. तिला कोणाच्या दावणीला बांधता येते. हे चित्रण पाहिले की समाजातील स्त्रीचे स्थान किती हीन दर्जाचे आहे हे आपल्या लक्षात येते. तसे 'अपने—अपने पिंजरे', 'जूठन', 'तिरस्कृत' हिंदीतील आत्मकथने वाचून येत नाही. या आत्मकथनातील स्त्रीजीवन स्वतंत्र पध्दतीने चित्रीत झालेले नाही. आत्मकथाकारांच्या चित्रणाच्या अनुषंगाने खूप कमी प्रमाणात स्त्रीजीवन चित्री झालेले नाही. जे झालेले आहे त्यातून वाचकांना त्या प्रदेशातील स्त्रीजीवनाची भयानकता नरजेत भरत नाही. मराठी आत्मकथनातील स्त्री जीवन म्हणजे वाचकाची संवेदना बधिर करणारे आहे. मनात विचाराचे काहूर माजवणार आहे. 'अक्करमाशी' मधील मसामाय, ही पात्र म्हणजे 'अक्करमाशी'च्या नायिका आहेत. मसामायचे जीवन वाचून कोणताही संवेदनशील वाचक चक्रावून जातो. ती या जातीव्यवस्थेची बळी आहे. पुरूषीय संस्कृतीची बळी आहे. यातील स्त्री ही अनिष्ट प्रथा परंपराचे बळी आहे. दारिद्र्याने दबलेली आहे. ती इथल्या सवर्णाच्या वासनेची बळी आहे. 'अक्करमाशी'तील मसामाय अनैतिक बलात्काराची धनी आहे. मराठी आत्मकथनातील स्त्री जीवनासंदर्भात आत्मकथाकाराची जी भूमिका आहे तशी भूमिका हिंदी आत्मकथाकारीच क्वचितच दिसून येते. या भूमिकेचे उदाहरण म्हणून 'अक्करमाशी' कार शरणकुमार लिंबाळेचे घेता येईल. ते मसामाय संदर्भात लिहीतात, ''मी माझ्या आईच्या व वडीलांच्या अनैतिकतेला बलात्कार समजतो. वडिलांकडं वर्ग—वर्णव्यवस्थेने दिलेले जन्मसिध्द अधिकार होते. त्यांच्या संभोगाला संस्कृतीनं प्रतिष्ठा दिलेली होती. तर याउलट माझी आई अस्पृश्य व दरिद्री, ती उच्च कुळात जन्मली हा व्यभिचार नसून माझी आई समाजव्यवस्थेची बळी आहे. याचं आकलन मला दलित चळवळ व दलित साहित्यातून झाल.'' (अक्करमाशी पृ. ६) ही भूमिका हिंदी आत्मकथाकारांनी घेतलेली नाही. 'स्त्री' अस्पृश्य आहे, दरिद्री आहे. ती या समाजव्यवस्थेची बळी आहे. स्त्री जीवनाच्या या स्थितीबद्दल विचार करताना मराठी दलित आत्मकथाकार या व्यवस्थेच्या मुळाशी जातात. तसे हिंदी आत्मकथाकाराचा दृष्टिकोन दिसून येत नाही.

मराठी दलित आत्मकथनातील स्त्रीजीवन बिनधास्तपणे, कोणताही आडपडदा न ठेवता जे आहे जसे आहे. तसे चित्रीत झालेले आहे. म्हणून तिच्यासंदर्भात करूणा निर्माण होते. 'कोल्हाटयाचं पोरं' या आत्मकथनातील 'कोल्हाटी' समाजातील 'स्त्री' म्हणजे सवर्णाची 'रखेली' म्हणून जीवनभर वागते. या समाजातील 'स्त्री' म्हणजे स्त्रीने अहोरात्र कष्ट करायचे आणि पुरूषाने तिच्या जीवावर मौजमजा करायची. स्त्रीयांनी कष्ट करायचे, राबायचे, आलेला पैसा मात्र पुरूषांजवळ आणून द्यायचा. हा पुरूष मात्र, बाप, भाऊ, काका असा कुणीही असू शकतो. स्त्री म्हणजे जणू घरात पैसे आणण्याची एक मशीन, ती मशीन जशी जशी जुनी, निकामी होत जाईल तसेतसे तिचे अवमुल्यन होत जाऊन शेवटी तिचे हाल कुत्र्यापेक्षाही वाईट अशी अवस्था. हे चित्रण फार आत्मीयतेने किशोर काळे यांनी केलेले आहे. किशोरची आई शांताबाई हिच्या वाटयाला रखेली, ठेवलेली बाई, नाचणारी बाई, वेश्या अशा उपमा येतात. त्यामुळे ही स्त्री वाचकांचे लक्ष वेधून घेते. तसे हिंदीतील एखाद्या आत्मकथनात जे चित्रण दिसत नाही. अपवाद कौशल्या बैसंत्री यांच्या 'दोहरा अभिशाप' या आत्मकथनाचा. पण या आत्मकथनात एक कर्तबगार, उच्चशिक्षीत स्त्री कोणते वाईट अनुभव येतात याचे वर्णन संयमितपणे केले आहे. मराठीतील 'माझ्या जल्माची चित्तरकथा' शांताबाई कांबळे यांच्या आत्मकथनाची तुलना करता येईल. कौशल्य बैसंत्री व शांताबाई कांबळे या दोघीही 'स्त्री' व 'दलित स्त्री' या दोन्ही गोष्टीमुळे त्या शोषणास बळी पडलेल्या आहेत. माणूस शिक्षित असो, अडाणी असा त्याची मानसिकता पुरूषी असते. या दोन्ही आत्मकथा नायिकांना आपल्या पतीकडून जी वाईट वागणूक मिळाली याचे चित्रण केलेले आहे. पण शांताबाई कांबळे यांच्या आत्मकथेत जी दाहकता आहे. ती दाहकता कौशल्या बैसंत्री यांच्या चित्रणात निश्चितच नाही. दोघीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना प्रेरणास्थानी मानतात. त्या पध्दतीने वागण्याचा प्रयत्न करतात. ही दलित चळवळीच्या दृष्टीने महत्वाची गोष्ट वाटते. पण शांताबाई कांबळे मात्र स्त्री सुधारणा विषयक कार्य करीत नाही ही बाब मात्र खटकणारी आहे. कारण शांताबाई कांबळे उच्च शिक्षित आहेत. शिक्षिका आहे त्यांना स्त्रीयांचे प्रश्न चांगल्याप्रकारे समाजात पण स्त्री जीवनाच्या उध्दाराचा वसा मात्र घेतलेला दिसत नाही. कौशल्या बसंती मात्र दलित स्त्रीयांना सुधारण्यासाठी महिला चळवळीमध्ये कार्य करतात. अनेक राजकीय व्यक्तींना भेटून स्त्रीयांसंदर्भात प्रश्नांची दखल घेण्यास सांगतात. ही बाब खरोखरच अभिमानास्पद आणि कौतूकास्पद आहे. हीच त्यांच्या आत्मकथनातील जमेची बाब आहे. पण साहित्यमूल्याचा विचार करता निश्चितच 'माझ्या जल्माची चित्तरकथा' लक्ष वेधून घेते. 'मै भंगी हूँ' भगवानदास यांच्या आत्मकथनात 'दलित स्त्री' ही सवर्णांच्या वासनेचा शिकार होते असे म्हटले आहे. पण हा सवर्ण म्हणजे मुस्लिम, राजपूत, जाट, जमिनदार. हे लोक दलितस्त्रीयांच्या अशिक्षीतपणाचा व अज्ञानाचा फायदा घेतात असे लिहीलेले आहे. मराठी आत्मकथनात, ब्राह्मण, मराठा या जातीतील लोक स्त्रीयांचे शोषण करतात असे अनेक संदर्भ सापडतात. पण मुस्लिम धर्मातील लोकांच्या दलित समाजाशी, अनुषंगाने स्त्रियांशी खूप कमी संपर्क येतो. त्यामुळे मुस्लिम लोक दलित स्त्रीयांचे शोषण करतात याचे संदर्भ सापडत नाहीत ही एक विशेषता लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे.

सारांशरूपाने म्हणता येईल की, मराठी आणि हिंदी आत्मकथनातील स्त्री जीवन हे सर्व स्तरातील शोषणाची मालमत्ता आहे. जातीव्यवस्थेच्या दृष्टीने ती सामाजिक दृष्टया कमजोर ठरलेली आहे. स्त्री म्हणून होणाऱ्या अन्याय, अत्याचाराची ती धनी ठरली आहे. हातावर पोट भरणाऱ्या आणि डोक्यावर उभा संसाराचा गाडा वाहणाऱ्या दलित स्त्रिया व कष्टाचया मूतिमंत प्रतिक ठरतात. साऱ्या बाजूने कोंडी झाल्यामुळे हवालदिल, हात बांधलेली, तोंड दाबून बुक्याचा मार सहन करणारी स्त्री मन दलित आत्मकथनात चित्रीत झालेले आहे. तसेच आपल्या परिस्थितीशी झुंजत राहणारी, जिद्द, कष्टाळू स्त्रीया दलित आत्मकथनात कारणीभूत आहे. जोपर्यंत पुरूषी मानसिकतेला विरोध केला आज नाही तो पर्यंत स्त्रीचे जीवन सुधारणार नाही. ''दलित स्त्री आपल्या दु:खाला वाचा फोडण्यासाठी बोलू लागेल तेव्हा एक वेगळेच दर्शन घडेल. बोलू लागेल याचा हिंदी आत्मकथनातील एक विशेष म्हणजे जास्त शिकार अर्थ ती आपले दु:ख वाङ्.मयबध्द करील असा असला पाहिजे.'' या डॉ. भालचंद्र फडके यांच्या मताच्या आधारे असे म्हणता येईल की दलित आत्मकथाकाराने दलित स्त्री जीवनचित्रण करून पुरूषाने स्त्रीजीवनाला फार आत्मियतेने आपुलकीने साकार केलेले आहे. म्हणून त्यांचे कौतूक करावे तेवढे कमीच आहे. ते आले तर साहित्याच्या, समाजाच्या कक्षा नक्कीच विस्तारल्या जातील असे वाटते आणि तेव्हा स्त्रीजीवनाला न्याय मिळेल असे म्हणता येईल.

**आधारभूत ग्रंथ सूची**

1. बलुतं:— दया पवार, ग्रंथाली प्रकाशन, दादर (प.) मुंबई—२८, पुनर्मुद्रण, २७ फेब्रूवारी २००९
2. माझ्या जल्माची चित्तरकथा:— शांताबाई कांबळे, सुगावा प्रकाशन, पुणे—३० आवृत्ती तिसरी, बुध्दपौर्णिमा ११मे १९९८.
3. उपरा:— लक्ष्मण माने, ग्रंथाली प्रकाशन, दादर (प.) मुंबई २८, पुनर्मुद्रण, १५ मे २००९
4. उचल्या:— लक्ष्मण गायकवाड, श्रीविद्या प्रकाशन, पुणे—३० नववी आवृत्ती, २६ जानेवारी २००९
5. अक्करमाशी:— शरणकुमार लिंबाळे, श्रीविद्या प्रकाशन, पुणे—३० सहावी आवृत्ती, २२ जुलै २००२
6. कोल्हाटयाचं पोर:— किशोर शांताबाई काळे, ग्रंथाली प्रकाशन, दादर (प.) मुंबई २८, पुनर्मुद्रण ३० मार्च २००६
7. मै भंगी हूँ:— भगवानदास, गौतम बुक सेंटर, शाहदरा, दिल्ली—९३ चतुर्थ आवृत्ती २०११
8. अपने अपने पिंजरे:— भाग—१ व भाग—२ मोहनदास नैमिरादास, वाणी प्रकाशन, दरियागंज, दिल्ली—९५ दुसरी आवृत्ती १९९६
9. जूठन:— ओमप्रकाश वाल्मिकी, राधाकृष्ण प्रकाशन, दरियागंज दिल्ली—९५, तिसरी आवृत्ती २००९
10. तिरस्कृत:— सूजरपाल चौहान, अनुभव प्रकाशन, लाजपतनगर साहिबाबाद, गाजियाबाद (उत्तरप्रदेश), प्रथम आवृत्ती,२००२
11. मेरा सफर मेरी मंजिल:— डॉ. डी. आर. जाटवा, समता साहित्य सदन, ४०, मीना कॉलनी, इमलीकला फाटक, जयपूर (राजस्थान) ०५, प्रथम आवृत्ती २०००

**संदर्भ सूची ग्रंथ**

1. प्रा. परदेशी प्रतिमा:— डॉ. आंबेडकर आणि स्त्री मुक्ती सावित्री फुले प्रकाशन चिंचवड, पुणे, आवृत्ती दिलेली नाही. पृ.३५
2. डॉ. खिंसवरा मंगला:— दलित भटक्या जातीतील स्त्री हा लेख, समुचित—ऑक्टोबर—नोव्हेंबर—डिसेंबर १९९४ पृ.क्र. ३६७
3. शास्त्री सुब्रहमण्यम भास्यकार :— श्री आनंद गिरीचार्य उपनिषद समग्र भाष्य खंड, वाराणसी, प्रथम आवृत्ती १९८६, पृ.क्र. १४७
4. डॉ. फडके भालचंद्र :— दि. ११ मे १९८५ रोजी भरलेल्या अस्मितादर्श साहित्य स्मेलनातील भाषण, समुचित, एप्रिल—मे—जून १९८७ या तून उद्घृत पृ.क्र. ५४.